


Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com

वर्ष ३ रे | अंक : ७६८. वा | शनिवार | दि. ११ मे २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# व्यक्तिगत सोडाच राजकीय दृष्टीनेही कधीच मोदींसोबत जाणार नाही, मोदींची ती ऑफर पवारांनी धुडकावली

वृत्तसंस्था/पुणे

शरद पवारांनी पक्ष काँग्रेसमध्ये विलीन होतील असा सूतोवाच केला आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी थेट पवारांना एनडीएमध्ये सामील होण्याची ऑफर दिली. पण पवारांनी ऑफरला न जुगारता ऑफर थेट धुडकावून लावली. पंतप्रधान नरेंद्र मोदी आज महाराष्ट्र दौऱ्यावर असताना नांदेड येथे भाषणादरम्यान त्यांनी हे वक्तव्य केलं आहे.पुण्यात एका कार्यक्रमाप्रसंगी शरद पवार यांनी पत्रकारांसोबत संवाद साधला. दरम्यान पक्ष विलीनीकरणासंदर्भात नरेंद्र मोदी यांनी व्यक्तव्य केलं होतं. प्रसंगी शरद पवार यांनी उत्तर दिलं आहे. राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी महायुतीसोबत यावं अशी ऑफर दिली होती. मात्र ही ऑफर पवार यांनी थेट धुडकावून लावली. शरद पवार म्हणाले, व्यक्तिगत संबंध वेगळे आणि धोरणात्मक संबंध वेगळे. मोदींमुळे संसदीय लोकशाही संकटात आली, असं माझं स्पष्ट मत आहे. दिल्ली आणि झारखंडचे मुख्यमंत्री यांना तुरुंगात टाकण्याची भूमिका घेतली. याच्यामागे केंद्र सरकार आणि केंद्रीय नेतृत्वाचा सहभाग असल्याशिवाय हे होऊ शकत नाही. यातून एक गोष्ट स्पष्ट होत आहे, की लोकशाही पद्धतीवर कोणाचा कितपत विश्वास आहे. व्यक्तिगत सोडा राजकीय दृष्टीने देखील माझ्याकडून कधीच होणार नाही. असं म्हणत पवारांनी मोदींची ती ऑफर धुडकावली.पुढे पवार असं म्हणाले, गांधी, नेहरूंची विचारधारा आमच्यात आहे. त्यांचं एक विधान मी वाचलं. मुस्लिम समाजाचा एक वेगळा उल्लेख केला. हा देश एक संघ ठेवायचा असेल, तर सर्व धर्म घटकांना एकत्र ठेवून देश पुढे न्यावा लागेल. एखाद्या समाजाविषयी वेगळी भूमिका मांडायला लागलो, तर समाजात गैर विश्वास निर्माण होईल. मोदींची अलीकडची सगळी भाषणं समाजा - समाजामध्ये गैरविश्वास निर्माण करणासाठी पोषक आहेत. देशाच्या दृष्टीने, समाजासाठी ते घातक आहे. जे देशाच्या हिताचं नाही तिथं मी, आमचे सहकारी असणार नाहीत.



# पाय घसरून तोल गेल्याने विवाहिता पडली विहिरीत

## हिंगणा शेतशिवारातील धक्कादायक घटना



जनसंचलन/ खामगाव

विहिरीवर पाणी भरण्यासाठी गेलेल्या १९ वर्षीय विवाहितेने मोटर सुरू असताना पाइप काढला. त्यावेळी पाय घसरल्याने तोल जाऊन विहिरीत पडल्याने विवाहितेचा मृत्यू झाल्याची घटना खामगाव तालुक्यातील हिंगणा शिवारात गुरुवारी घडली. पल्लवी संदीप कुल्हाड असे मृत विवाहितेचे नाव आहे. दरम्यान, याप्रकरणी तिच्या माहेरच्या नातेवाइकांनी घातपाताचा संशय व्यक्त केला आहे. याप्रकरणी पोलिसांनी दिलेल्या फिर्यादिवरून आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. गजानन सुखदेव कुल्हाड (२०, रा. नांद्री, ता. खामगाव) यांनी खामगाव ग्रामीण पोलिस स्टेशनला तक्रार दिली की, त्यांची पत्नी पल्लवी ही हिंगणा शिवारातील शेषराव चव्हाण यांच्या शेतातील विहिरीवर पाणी भरण्यासाठी गेली होती. पाणी भरताना तिने अचानक मोटरचा पाइप काढला. त्यावेळी पाण्याच्या अधिक दाबामुळे तिचा पाय घसरून तोल गेल्याने ती विहिरीत पडली. पाण्यात बुडून तिचा मृत्यू झाल्याचे तक्रारीत म्हटले. या तक्रारीवरून खामगाव ग्रामीण पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक राची पुसाम करीत आहेत. याप्रकरणी संशय व्यक्त करीत मृत विवाहितेच्या माहेरचे नातेवाइकांनी खामगाव ग्रामीण पोलिसांत धडक दिली. मुलीचा घातपात झाल्याचा त्यांनी संशय व्यक्त केल्याचे पोलिस सूत्रांनी सांगितले. त्या अनुषंगाने पोलिसांचा तपास सुरू असल्याचे समजते. पोलिसांच्या तपासात विवाहितेच्या मृत्यूच्या घटनेचे कोडे उलगडणार आहे.

# उभ्या ट्रकवर भरधाव ट्रक येऊन धडकल्याने दोन जण जागीच ठार



जनसंचलन/ खामगाव

उभ्या ट्रकवर भरधाव ट्रक येऊन धडकल्याने दोन जण जागीच ठार झाले. ही घटना गुरुवारी सायंकाळी कोक्ता शिवारातील रेल्वे पुलाजवळील मारुती मंदिराजवळ घडली.प्राप्त माहितीनुसार, मारुती मंदिरासमोर लोखंडी अँगल घेऊन जाणारा ट्रक क्रमांक जीजे ३९ टी ९५९५ हा ट्रक या ठिकाणी उभा होता. या उभ्या ट्रकवर भरधाव वेगात आंबे घेऊन येणारा एमएच-१८, बीझेड- ७२२२ या क्रमांकाचा ट्रक येऊन आदळला. यात आंबे घेऊन जाणाऱ्या ट्रकमधील चालक आणि वाहक यांचा जागीच मृत्यू झाला. तर ट्रकच्या कॅबिनचा पूर्णतः चुराडा झाला. या - घटनेमुळे रस्त्यावरील वाहतूक काही - काळ विस्कळीत झाली होती. - जलाउद्दीन खान फारुख खान (३०), बबलू रामगोपाल (४२) दोघेही रा. बालसमुद्र, ता. कसरावद, जि. खरगोन मध्यप्रदेश अशी अपघातातील मृतकांची नावे आहेत. या प्रकरणी रूपाभाई माझाभाई रबारी (४२)रा. मिंदियारा, ता. अंजार, जि. कच्छी जमीन गुजरात यांच्या तक्रारीवरून जलंब पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

# मलकापूर, नांदूरा तालुक्यात कलम १४४ लागू झाली...

जनसंचलन/बुलडाणा

रावेर लोकसभा मतदारसंघासाठी सोमवारी, दि. १३ मे रोजी मतदान होणार आहे. या मतदारसंघात जिल्ह्यातील मलकापूर आणि नांदुरा तालुक्याचा समावेश असल्याने याठिकाणी दि. ११ मे च्या सायंकाळी ६ वाजल्यापासून दि. १३ मे २०२४ रोजी मतद-ानाची प्रक्रीया पूर्ण होईपर्यंत निर्बंध लागू करण्यात आले आहे. रावेर लोकसभा मतदारसंघात जिल्ह्यातील मलकापूर आणि नांदुरा तालुक्याचा समावेश असल्याने येथे दि. १३ मे २०२४ रोजी सकाळी ७ वाजल्यापासून सायंकाळी ६ वाजेपर्यंत मतदान होणार आहे. निवडणुकीच्या आदर्श आचारसंहितेचा जिल्ह्यातील संपूर्ण कार्यक्षेत्रात कोणताही भंग होऊ नये, सदर आचार संहितेचे यथायोग्य पालन होण्यासाठी उपाययोजना करणे आवश्यक असल्याने फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ अन्वये निर्बंध लागू केले आहेत. तसेच मतदानाच्या दिवशी मतदान केंद्राच्या परिसरात विशेष निर्बंध लागू करण्यात आले आहे. फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (१) नुसार जिल्हादंडाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी रावेर लोकसभा मतदारसंघांतर्गत जिल्ह्यातील मलकापूर आणि नांदुरा तालुक्यात दि. ११ मे २०२४ च्या सायंकाळी ६ वाजल्यापासून दि. १३ मे २०२४ रोजी मतदानाची प्रक्रीया पूर्ण होईपर्यंत निर्बंध लागू केले आहे. यामुळे सदर कालावधीत बेकायदेशीर जमाव जमविणे आणि सार्वजनिक प्रचार सभा आयोजनास बंदी राहील. लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ करीता मतदान पथके मतदान केंद्रावर पोहचल्यानंतर मतदान केंद्राच्या २०० मीटर परिसरामध्ये ध्वनीक्षेपकांच्या वापरावर पूर्णपणे निर्बंध राहणार आहे. तसेच मतदान केंद्राच्या २०० मीटर त्रिज्येच्या परिसरात कोणत्याही सार्वजनिक किंवा खासगी जागेमध्ये ध्वनीवर्धक किंवा ध्वनीक्षेपक यासारखे मानवी आवाजाचे वर्धन करणाऱ्या किंवा जसाच्या तसा ऐकविणारे उपकरण संच ला-वणे, वापरणे आणि चालविण्यास प्रतिबंध घालण्यात आले आहे. मतदारांना पुरविण्यात आलेल्या अनौपचारिक ओळखचिठ्ठया साध्या पांढ्या कागदावर असाव्यात व त्यावर कोणतेही चिन्ह, उमेदवाराचे नाव किंवा पक्षाचे नाव मुद्रित करण्यावर बंदी राहणार आहे. मतदान केंद्राच्या १०० मीटर परिसरात निवडणूक कर्तव्यावरील वाहन वगळता इतर सर्व वाहनांना बंदी राहणार आहे. मतदान केंद्रात मतदार, उमेदवार आणि त्यांचे निवडणूक मतदान प्रतिनिधी याव्यतिरिक्त फक्त निवडणूक आयोगाकडून वैध प्राधिकारपत्र मिळवलेल्या व्यक्तीनाच प्रवेश रा-हणार आहे. या व्यतिरिक्त इतर व्यक्तींना मतदानकेंद्रात प्रवेशावर बंदी असेल. मतदारांना लाच देणे, मतदारावर गैरवाजवी दडपण, मतदारांना धाकदपट दाखविणे, तोतयेगिरी करणे, तसेच मतदान केंद्राचे १०० मीटर परीसरात प्रचार करण्यास बंदी राहणार आहे. मतदारांना मतदानाचे दिवशी मतदान केंद्रावर ने-आण करण्याचे प्रथेस पायबंद घालण्यासाठी टॅक्सी, खासगी कार, ट्रॅक, ऑटो रिक्शा, मिनी बस, स्टेशन व्हॅन, स्कूटर, मोटार सायकल आदी सर्व प्रकारच्या वाहनावर बंदी राहणार आहे मतदानाच्या दिवशी ओळखचिठ्या वाटपाच्या ठिकाणी किंवा मतदान केंद्राचे परिसरात भित्तीपत्रके, ध्वज, चिन्ह आणि इतर प्रचार साहित्य यांचे प्रदर्शन करण्यास बंदी राहणार आहे. ज्या व्यक्तीच्या सुरक्षिततेला धोका असल्याबाबत खात्री पटल्यामुळे सरकारी सुरक्षा पुरविण्यात आली असेल, अशी कोणतीही व्यक्ती त्याच्या सुरक्षा कर्मचाऱ्यासह मतदारकेंद्राचे १०० मीटर परिसरात प्रवेश करणार नाही. तसेच अशी व्यक्ती मतदार असली तरी निव्वळ मतदान करण्याकरिता सुरक्षा कर्मचाऱ्यासह मतदार केंद्र परिसरात ये-जा करण्यावर निर्बंध राहील. विशेष सुरक्षा व्यवस्था प्रदान केल्या व्यक्तीच्या विशेष सुरक्षा पथकास शस्त्रांसह मतदान केंद्राचे केवळ दारापर्यंत संरक्षित व्यक्तीसोबत जाता येईल. एका वैयक्तिक सुरक्षा अधिकाऱ्यास शस्त्राचे प्रदर्शन न करता, तसेच मतदान प्रक्रियेत कोणत्याही प्रकारे अडथळा न करता संरक्षीत व्यक्तीस मतदान केंद्रात सोबत करता येईल. ज्या व्यक्तीच्या सुरक्षिततेला धोका असल्याबाबत खात्री पटल्यामुळे सरकारी सुरक्षा पुरविण्यात आली असेल किंवा त्या व्यक्तीकडे खासगी सुरक्षारक्षक आहेत, अशा कोणत्याही व्यक्तीस निवडणूक प्रतिनिधी किंवा मतदान प्रतिनिधी म्हणून नियुक्ती करण्यास बंदी राहील. मतदान केंद्रात मतदानाचे दिवशी मोबाईल, स्मार्टफोन, वायरलेस सेट आदी नेण्यास प्रतिबंध राहिल. मतदान केंद्राध्यक्ष, आचारसंहिता, कायदा व सुव्यवस्था पथक प्रमुख, निवडणूकीच्या कर्तव्यावरील सुरक्षा कर्मचारी यांना सदर प्रतिबंध लागू राहणार नाही. निर्बंधांचे कालावधीत रावेर लोकसभा मतदारसंघातील मलकापूर आणि नांदुरा तालुक्यामधील निवडणूक प्रचार दि. ११ मे २०२४ रोजी सायंकाळी ६ वाजल्यापासून बंद होत असला तरी घर-घरी जाऊन प्रचारावर निर्बंधाचे कालावधीत प्रतिबंध असणार नाही. परंतू ५पेक्षा अधिक व्यक्तींना एकत्र येण्यास प्रतिबंध असेल. दवाखान्याच्या गाड्या, ॲम्बुलन्स, दुधगाड्या, पाण्याचे टॅंकर्स, विद्युत विभाग, पोलीस, निवडणूक कर्मचारी यांच्या वाहनावर बंदी राहणार नाही. विहित मार्गाने जाणाऱ्या बस गाड्यावर बंदी राहणार नाही. टॅक्सी इत्यादी वाहने बस स्टेशन, रेल्वे स्टेशन हॉस्पीटलकडे जाणारी वाहने यावर बंदी राहणार नाही. दिव्यांग, आजारी व्यक्तीस मतदान केंद्रावर मतदान करण्यासाठी जाणे-येण्याकरीता आज-ारी, दिव्यांग व्यक्तीचे वैयक्तीक वाहनास बंदी असणार नाही. सदर आदेशाचे उल्लंघन झाल्यास भारतीय दंड संहिता १८६० चे कलम १८८ नुसार कार्यवाही करण्यात येणार आहे.

# पुरेसा ओलावा असल्याशिवाय पेरणी करू नये

## कृषि विभागाचे आवाहन...

जनसंचलन/बुलडाणा

शेतकऱ्यांनी खरीप हंगाम सन २०२४ मध्ये जमिनीत पुरेसा ओल-ावा निर्माण झाल्याशिवाय सोयाबीन, तूर, मूग, उडीद, कपाशी बियाण्याची पेरणी करू नये, असे आवाहन कृषि विभागातर्फे करण्यात आले आहे. शेत जमिनीची ओल ४ ते ६ इंच किंवा १०० मीमी पाऊस झाल्याशिवाय शेतकऱ्यांनी कोणत्याही बियाण्याची पेरणी करू नये, जमिनीमध्ये पुरेसा ओलावा नसताना पेरणीची घाई केल्यास जमिनीतील उष्णतेमुळे पेर-लेले बियाण्यांचे अंकुरण होणार नाही किंवा अंकुरण होऊन जळण्याची भिती आहे. त्यामुळे शेतकऱ्यांवर दुबार पे-रणीचे संकट येण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच शेतकऱ्यांचा वेळ व आर्थिक नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. शेतकऱ्यांनी आर्थिक नुकसान होऊ नये, यासाठी कृषी विभागाच्या संदेशानुसार १०० मीमी पाऊस पडल्यानंतरच किंवा जमिनीची ओल ४ ते ६ इंच किंवा जमिनीमधील उष्णता जाईपर्यंत शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये. शेतकऱ्यांनी कोणत्याही पिकाची धूळपे-रणी करू नये. खरीप हंगामातील सर्व पिके जमिनीत पुरेशी ओल म्हणजेच जमीन ४ ते ६ इंच ओल झाल्याची खात्री करूनच पेरणी करावी, असे आ-वाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी मनोजकुमार ढगे यांनी केले आहे.

# नळावर पाणी भरण्यास आलेल्या महिलेचा केला विनयभंग

जनसंचलन/शेगाव

नळावर पाणी भरत असतांना दारू पिऊन आलेल्या शेजारच्या इसमाने हात पकडून ३८ वर्षाच्या महिलेचा विनयभंग केल्याची घटना ८ मे रोजी रात्री ८ वाजता घडली. याबाबत पीडितेने शहर पोलिसात फिर्याद दिली की, माझ्या शेजारी रा-हणारा आरोपी दिनेश रमेश इंगळे रा. सुदामा नगर शेगाव हा काही एक कारण नसतांना नेहमी शिवीगाळ करतो. ८ मे रोजी रात्रीच्या वेळी नळ आल्याने मी नळावर पाणी भरत असताना आरोपी माझ्याजवळ आला त्यावेळी तो दारू पिलेला होता. त्याने नळाला लावलेला हांडा उचलत असताना त्याने माझा एकदम हात पकडला व हात ओढुन मला चाल असे म्हणून लागला म्हणून मी त्याला माझा हात सोड असे म्हणून आरडा ओरड केली असता त्याने मला कोणाला काही सागीतले तर तुला तुझे परीवाराला जिवाने ठार मारून टाकील



अशी मला धमकी देत पळून गेला आहे. मकआराडा ओरड केला त्या ठिकाणी दोन महिलांनी त्यांचे दारात उभे ही घटना पाहीली आहे. अशा तोंडी रिपोर्टवरून कलम ३५४, ३५४ अ, ५०६ भादवि नुसार गुन्हा दाखल केला आहे

# मेहकर शहरात चोरट्यांचा धुमाकूळ, अडीच लाखांचा ऐवज केला लंपास

जनसंचलन/मेहकर



शहरातील रामनगरजवळील लक्ष्मी नारायण नगर, महादेव वेटाळ व गणपती गल्लीत अज्ञात चोरट्यांनी बुधव-ारी रात्री धुमाकूळ घालत दोन लाख २८ हजार ७३२ रुपयांचा ऐवज लंपास केला. याप्रकरणी मेहकर पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. लक्ष्मी नारायण नगरातील प्रा. निवृत्ती विठ्ठल कापसे हे ८ मे रोजी सायंकाळी परिवारासह चिखली येथे गेले होते. या संधीचा लाभ घेत अज्ञात चोरट्यांनी घराची कडी तोडून घरा-तील नगदी २५ हजार रुपये, शॉट पोथ, सोन्याची बाळी, चांदीचे दागिने, लहान मुलांचे कडे, चेन व मुंडवाळे किंमत ६४,४०० असा ९०,४०० रुपयांचा ऐवज लंपास केला. त्यानंतर चोरट्यांनी याच नगरातील जीवनकुमार भिकमचंद शर्मा यांच्या घराची कडी तोडून नगदी २५ हजार रुपये व ५ ग्रॅमची सोन्याची अंगठी किंमत ५५ हजार असा ८० हजार रुपयांचा ऐवज लंपास केला. पढे कपाटातून दागिणे लंपास केले. याच नगरातील सुजीत हरिनारायण सा-वजी यांच्यासुद्धा घराचा कडी कोयंडा तोडून आत प्रवेश केला, मात्र काही सापडले नाही तसेच कालच्याच रात्री महादेव वेटाळातील गजानन भगवान सुर्वे हे रुग्णालयात गेले असता त्यांच्या घराचा कडी-कोयंडा तोडन आत प्रव-ेश करीत पाच हजार रुपये रोख व सोन्या-चांदीचे दागिने असा ६९ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला. तर गणप-ती गल्लीतील गणपतीच्या डोक्यावरील चांदीचा टोप किंमत १४ हजार ३३२ रुपये चोरट्यांनी पळवला आहे.

The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

# शासकीय वसतीगृहात प्रवेशासाठी अर्ज करण्याचे आवाहन

जनसंचलन/बुलडाणा

विद्यार्थ्यांनी शासकीय वसतीगृहात प्रवेश मिळविण्यासाठी येत्या शैक्षणिक वर्षासाठी ऑफलाईन अर्ज करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील सर्व इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या-जमाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या जिल्हास्तरावरील मुला-मुलींच्या शासकीय वसतीगृहात प्रवेशित विद्यार्थ्यांना सर्व सोयीसुविधा मोफत पुरविण्यात येतात. सन २०२४-२५ करीता ज्या विद्यार्थ्यांना प्रवेश घ्यावयाचा आहे, अशा विद्यार्थ्यांनी स्थानिक वसतीगृहात प्रवेशाकरीता सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, बुलडाणा येथे अर्ज उपलब्ध असून सदर अर्ज कार्यालय



सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, बुलडाणा येथे सन २०२४-२५ या शैक्षणिक सत्राकरीता ऑफलाईन पद्धतीने अर्ज सादर करावेत. संबंधित जिल्हास्तरावरील वसतीगृहात प्रवेशाबाबत इच्छुक विद्यार्थ्यांनी अर्ज भरुन सदर अर्ज आवश्यक कागदपत्रांसह कार्यालय सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, सामाजिक न्याय भवन, चिखली रोड, बुलडाणा येथे सादर करावे, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहाय्यक संचालक मनोज मेरत यांनी केले आहे.

# शेंदरी बोंड अळीचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना सुरू

जनसंचलन/बुलडाणा

बुलडाणा जिल्ह्यात खरीप २०१७ च्या हंगामात शेंदरी बोंड अळीचा प्रादुर्भाव झाला होता. खरीप २०१८ ते २०२३ मध्ये राबविण्यात आलेल्या उपाययोजनांमुळे शेंदरी बोंड अळीचा प्रादुर्भाव अत्यल्प प्रमाणात आढळून आला आहे. येत्या खरीप २०२४ च्या हंगामामध्ये शेंदरी बोंड अळीचा प्रादुर्भाव होऊ नये, यासाठी क्षेत्रिय पातळीवर आतापासूनच प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्यात येत आहे. शेंदरी बोंड अळीचा जीवनक्रम खंडीत झाला नसल्यास प्रादुर्भाव वाढत असल्याचे दिसून येते. हंगामपूर्व कापूस लागवड झाल्यास शेंदरी बोंड अळीचा जीवनक्रमास पोषक वातावरण निर्माण होऊन प्रादुर्भाव वाढण्याचा धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. ही बाब लक्षात घेता खरीप २०२४ मध्ये शेंदरी बोंड अळीच्या प्रादुर्भावास आळा घालण्याकरिता शेंदरी बोंड अळीचा जीवनक्रम खंडित होण्यासाठी अनेक उपाययोजनांपैकी एक उपाययोजना म्हणून हंगामपूर्व कापसाची लागवड होणार नाही, यादृष्टीने काळजी घेणे आवश्यक आहे. त्यासाठी मान्सूनपूर्व लागवड टाळण्याबाबत आवाहन करण्यात आले आहे. उपाययोजना म्हणून दि. १६ मे २०२४ पासून शेतकऱ्यांना बियाणे उपलब्ध करून प्रत्यक्ष लागवड ही दि. १ जून २०२४ नंतरच केल्यास शेंदरी, गुलाबी बोंड अळीचा प्रादुर्भाव प्रभावीपणे नियंत्रित करणे शक्य होईल. याकरिता क्षेत्रीय स्तरावरील कटाक्षाने पालन करण्याबाबत तंत्र अधिकारी, तालुका कृषि अधिकारी, कृषि अधिकारी, सर्व पंचायत समिती यांच्यामार्फत काटेकोर नियोजन करून अंमलबजावणी करण्यात येत आहे. उपविभागीय कृषि अधिकारी यांच्यामार्फत सनियंत्रण ठेवण्यात येणार आहे. शेंदरी बोंड अळीचे चक्र भेदण्यासाठी मान्सूनपूर्व कपाशीची लागवड थांबविण्याबाबत कापूस बियाणे पुरवठा करण्याबाबत दि. १ ते १० मे २०२४ दरम्यान उत्पादक कंपनी ते वितरक, दि. १० मे २०२४ नंतर वितरक ते किरकोळ विक्रेता, दि. १५ मे २०२४ नंतर किरकोळ विक्रेता ते शेतकरी आणि दि. १ जूननंतर शेतकऱ्यांना प्रत्यक्ष लागवडीचे नियोजन करण्यात आले आहे. या निर्देशाचे उल्लंघन झाल्यास संबंधीत कंपनी, वितरक, किरकोळ विक्रेता यांच्यावर महाराष्ट्र कापूस बियाणे पुरवठा, वितरण, विक्री व विक्रीच्या किंमतीचे निश्चितीकरण यांचे विनियमन अधिनियम २००९ नुसार कारवाई करण्यात येणार आहे, असे जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी मनोजकुमार ढगे यांनी कळविले आहे.

# बोरी-अडगाव,शहापूर रस्त्याचे काम गेल्या सहा महिन्यांपासून सुरू,अजूनही पूर्ण होईना!

## अर्धवट कामामुळे वाहनाचे नुकसान,प्रवाशांनाही त्रास!

जनसंचलन/ खामगाव

गेल्या सहा महिन्यांपासून सुरू असलेल्या खामगाव तालुक्यातील बोरी - अडगाव ते शहापूर या मुख्य रस्त्याचे काम अजूनही अपूर्णच आहे. वाहन चालक, प्रवाशी यांना नाहक त्रास होत, असला तरी मात्र सार्वजनिक बांधकाम विभाग गाढ झोपेत असल्याचे चित्र दिसत आहे. मागील सहा महिन्याआधी खामगाव बोरी-अडगाव ते शहापूर या मुख्य रस्त्याचे काम सुरू करण्यात आले होते.सहा महिने उलटून गेले तरीही रस्त्याचे काम पूर्ण करण्यात आलेले नाही. याचाच त्रास रस्त्याने येणाऱ्या जाणाऱ्या वाहनासह नागरिकांना



सहन करावा लागत आहे. बोरी अडगाव गावांमधील रस्त्याचे कामही अपूर्णच झाल्याने गावातील नागरिकांना सुद्धा याचा त्रास होत आहे. पहिल्या टप्प्यातील जाडी खडी डांबरीकरणाचे काम करून बाकीचे काम थांबल्यामुळे वाहनधारकांना या रस्त्याचा फटका बसत असल्याने वाहनाचे नुकसान होत आहे.रस्त्यात टाकलेल्या बारीक चुरीमुळे दुचाकी चालक, ऑटोचालकांना त्रास सहन करावा लागत आहे. पावसाळा सुरू होण्याआधी या मुख्य रस्त्याचे काम सुरू करण्याची मागणी परिसरातील नागरिक करीत आहेत.

# २२ वर्षीय विवाहित महिला बेपत्ता

जनसंचलन/ शेगाव

येथील बसस्थानकावरूनवानखेड करिता जाण्यासाठी बसमध्ये बसलेली २२ चू वर्षीय विवाहिता बेपत्ता झाल्याची घटना ५ मे रोजी सकाळी ७ वाजता घडली. याबाबत कैलास समाधान पारिसे वय २८ वर्षा. वानखेड यांनी पोलिसात फिर्याद दिली की, माझी आकडसासू यांनी मला वरून ना सांगितले कि तुमची आकडसासुनामे -. रेणुका उर्फ सोनु रमेश मिना वय २२ वर्ष ही शेगांव येथे बसस्थानक वर आली आले तुम्ही तीला जळगाव जा. बस मध्ये बसून द्या तेव्हा मी शेगाव बसस्थानकावर माझ्या आकड सासला भेटलो तेव्हा त्या म्हणाल्या कि माझ्या मोबाइलची चार्जिंग संपली नाही टके गहाळ आहे. मला चार्जर घेणे करिता २५० रुपये द्या तेव्हा




मी तिला म्हटले की, माझे कडे पैसे नाही. त्यानंतर मी तिला जळगाव जा. बसमध्ये बसून दिलेवबसचे कंडक्टर यांना सांगितले कि हिला वानखेड फाट्या वर उतरवुन द्या व मी माझे उधारीचे पैसे आणणे करिता निघुन गेलो. माझे शेगावचे काम संपवुन मी दुपारी १२ वाजता घरी गेलो तेव्हा त्या घरी नव्हत्या शोध घेतल्यावर आल्या नाही अशा तोडी रिपोर्ट वरुन मिसींग दाखल करण्यात आली आहे.

# बाल शक्ती पुरस्कार पुरस्कारासाठी अर्ज करण्याचे आवाहन...

जनसंचलन/बुलडाणा

केंद्र शासनाच्या महिला व बालविकास विभागामार्फत बाल शक्ती पुरस्कार पुरस्कार दिला जातो. या पुरस्कारासाठी पात्र व्यक्तींनी अर्ज करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कारासाठी ५ वर्षे पेक्षा अधिक आणि १८ वर्षापर्यंतच्या मुलांनी शिक्षण, कला, सांस्कृतिक कार्य, खेळ नाविन्यपूर्ण शोध, सामाजिक कार्य आणि शौर्य अशा क्षेत्रात विशेष नैपुण्यपूर्ण कामगिरीसाठी हा पुरस्कार दिला जातो. प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार २०२५ करिता केंद्र शासनाने अर्ज मागविले आहेत. सदरचे अर्ज awards.gov.in संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने स्विकारले जाणार आहे. यासाठी मुलांचे वय दि. ३१ जुलै २०२४ रोजी ५ वर्षापेक्षा अधिक आणि १८ वर्षापेक्षा कमी आहे, अशा मुलांनी त्यांचे प्रस्ताव संकेतस्थळावर स्वतः मुले किंवा त्यांचे वतीने राज्य सरकार, केंद्रशासित प्रदेश, जिल्हाधिकारी, जिल्हादंडाधिकारी, पंचायत राज्य संस्था, नागरी स्वराज्य संस्था, शैक्षणिक संस्था आदी अर्ज करु शकतील. जास्तीत जास्त मुलांनी प्रस्ताव सादर करावेत, असे आवाहन जिल्हा बालसंरक्षण कक्षाने केले आहे.

# असहकार संपेना, मनोमिलन होईना; मित्रांमुळेच वाढली डोकेदुखी, महायुतीत कुठे कोणाची गोची?

वृत्तसंस्था/मुंबई

राज्यात लोकसभा निवडणुकीचे अद्याप दोन टप्पे शिल्लक आहेत. या दोन टप्प्यांमध्ये लोकसभेच्या एकूण २४ जागा येतात. म्हणजेच लोकसभेच्या निम्म्या जागांवर अद्याप मतदान व्हायचं आहे. असं असताना महायुतीची चिंता वाढली आहे. महायुतीचे विविध मतदारसंघातील नेते, आमदार मित्रपक्षांच्या उमेदवारांच्या मागे भक्कमपणे उभं राहत नसल्याचं चित्र दिसू लागलं आहे. अनेक मतदारसंघात मित्रपक्षांनी प्रचारापासून अंतर राखलं आहे. त्यामुळे महायुतीचे उमेदवार अडचणीत आले आहेत.राज्यात महायुतीला फटका बसू नये म्हणून वरिष्ठ पातळीवरुन मनोमिलनाचे प्रयत्न सुरु आहेत. पण अद्याप तरी त्यात हवं तसं यश आलेलं नाही. नाशिक, दिंडोरीत उघड नाराजी दिसून येत आहे. नाशिकमधून निवडणूक लढवण्यास छगन भुजबळ उत्सुक होते. त्यांच्या नावाची चर्चा दिल्लीतही झाली. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा त्यांच्या नावाबद्दल आग्रही होते. पण नाशिकची जागा शिंदेकडे असल्यानं त्यांनी दावा सोडला नाही. त्यामुळे भुजबळांनी माघार घेतली. पण त्यांची नाराजी कायम असल्याचं बोललं जातं. भुजबळ महायुतीच्या उमेदवाराचा प्रचार करत नसल्याचा आरोप शिंदेसेनेचे आमदार सुहास कांदेंनी जाहीरपणे केला आहे.नाशिकसोबतच दिंडोरी मतदारसंघातही महायुती एकदिलानं काम करताना दिसत नाही. दिंडोरीतून भाजपनं डॉ. भारती पवार यांना पुन्हा तिकीट दिलं आहे. पण अजित पवार गटाचे काही आमदार त्यांच्या प्रचारात दिसत नाहीत. या आमदारांचे प्रमुख कार्यकर्ते शरद पवार गटाचे उमेदवार भास्कर भगरेंच्या प्रचारात उतरल्याची चर्चा आहे. भुजबळ तुतारीचा प्रचार करत असल्याचा आरोप आमदार कांदेंनी केला आहे.जळगाव, रावेर मतदारसंघांमध्ये शिंदेसेनेचे आमदार, नेते भाजप उमेदवारांच्या पाठिशी ठामपणे उभे राहिले असल्याचं चित्र दिसलेलं नाही. ठाकरेसेनेचे खासदार संजय राऊतांनी जळगावमध्ये येऊन शिंदेसेनेच्या आमदारांवर टीका केली, आरोप केले. त्यानंतर शिंदेसेनेचे मंत्री गुलाबराव पाटील यांनी मी आतापर्यंत सक्रिय नव्हतो, पण आता महायुतीला जिंकवणारच असा निर्धार केला.शिंदेसेनेचे आमदार २०१९ मध्ये भाजप-शिवसेना युतीत लढले तेव्हा अनेक ठिकाणी भाजपनं बंडखोर दिले होते. त्या गोष्टी सेनेचे आमदार विसरलेले नाहीत. आज तुम्हाला आमचा पाठिंबा हवाय, पण त्यावेळी तुम्हीच आम्हाला त्रास दिला होतात, याची आठवण सेनेच्या आमदारांनी भाजपच्या नेत्यांना जाहिरपणे करुन दिली होती. धुळ्यात सुरुवातीला नाराजी होती. विश्वासात घेतलं जात नसल्याची भावना शिंदेसेना आणि अजित पवार गटाची होती. पण आता ती दूर झाली आहे.नंदुरबारमध्ये भाजपनं विद्यमान खासदार हीना



गावित यांनाच तिकीट दिलं आहे. त्यांच्या प्रचारात अजित पवार गट सक्रिय आहे. पण शिंदेसेनेचे प्रमुख नेते, माजी आमदार चंद्रकांत रघुवंशी सक्रिय दिसत नाहीत. आदिवासी विकास मंत्री डॉ. विजयकुमार गावित यांच्यासोबत रघुवंशी यांचा नेहमीच संघर्ष राहिला आहे. उमेदवार हीना गावित यांनी रघुवंशी यांची भेटही घेतली. पण त्याचा फायदा अद्याप तरी झालेला नाही.

## समृध्दी महामार्गावर चाकू दाखवून १:६५ लाख रुपयांचा ऐवज लंपास




जनसंचलन/ डोणगाव

समृद्धी महामार्गावरील पेट्रोलपंपच्या सर्व्हिस रोडवर १० मे रोजी पहाटेच्या वेळी चारचाकी वाहनात आराम करीत असलेल्या कुटुंबांना तिघांनी चाकूच्या धाकावर लुटले. चोरट्यांनी कारमधील एक लाख ६५ हजार रुपयांचा ऐवज लुटून पळ काढला. समृद्धी महामार्गावर डोणगाव जवळील पेट्रोल पंपच्या सर्व्हिस रोडवर फिर्यादी ऋषिकेश शिवाजी दुरगुळे, रा. तेरखेडा, ता. वाशी, जि. धाराशिव व त्यांचे नातवोईक हे वाहन क्रमांक एमएच १२ जेसी १९१९ मध्ये आराम करण्यासाठी थांबले होते. यावेळी त्यांच्या वाहनांजवळ अज्ञात तीन जण आले. त्यांनी चाकूचा धाक दाखवून फिर्यादीच्या खिशातील दोन हजार रुपये रोख, गाडीमध्ये असलेल्या बॅगमधील दोन लॅपटॉप किंमत ४० हजार, तसेच त्यांची बहीण स्नेहल यांचे २० ग्रॅमचे सोन्याचे मंगळसूत्र किंमत एक लाख व सोन्याची अंगठी किंमत १५ हजार असा १ लाख ६५ हजार रुपयांचा एवज बळजबरीने काढून पोबारा केला. याप्रकरणी काढून डोणगाव पोलिसांनी अज्ञात आरोपींविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

## मुठे ले आऊटसह इतर भागातील पाणी पुरवठा ५ ते ६ दिवस आड करा

### न.पा.ने टॅक्स मध्ये पेनॉल्टी घेऊनये : गणेश भोसले यांची मागणी

जनसंचलन/बुलडाणा

शहरातील मुठे ले आऊट, तानाजी नगर, मच्छी ले आऊट या भागातील पाणी पुरवठा ९ ते १० दिवसानंतर होत आहे. यामुळे या भागातील नागरीकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. शहरात असूनही पाणी विकत घेवून प्यावे लागते. त्यामुळे ५-६ दिवसआड पाणी पुरवठा करावा, तसेच न.पा.ने टॅक्स मध्ये पेनॉल्टी घेऊ नये, अशी मागणीचे निवेदन सामाजिक कार्यकर्ता गणेश भोसले व या भागातील नागरीकांच्या वतीने न.प.उपमुख्याधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. या निवेदनात नमुद केले आहे की, आम्ही मुठे ले आऊट मधील रहिवासी असुन आमच्या भागात ९ ते १० दिवसानंतर अपुरा पाणी पुरवठा होत आहे. भर उन्हाळयात आमच्या भागात ९ ते १० दिवसआड अपुरा पाणी पुरवठा होत आहे. उन्हामुळे सध्या पाण्याची नितांत गरज असून शहरात राहुन सुध्दा पिण्यासाठी पाणी विकत घेवून प्यावे लागत आहे. या भागात ५ ते ६ दिवसाआड नियमित पाणी पुरवठा करण्यात यावा अशी मागणी या भागातील नागरीकांनी केली आहे. तसेच न.प. प्रशासन जुलै महिण्यात टॅक्स आकारते, व तो टॅक्स भरण्याची मुदत मार्च महिण्यापर्यंत असतांना सुध्दा न.प. प्रशासन टॅक्स मुदीत भरुन सुध्दा त्या टॅक्सवर पेनॉल्टी आकारीत आहेत. मुदत संपल्यानंतर पेनॉल्टी आकारली तर ठिक आहे, परंतु मार्च महिण्यात सुध्दा टॅक्स भरला तरी पेनॉल्टी रक्कम वसुल करण्यांत येते. हा नागरीकांवर एक प्रकारे अन्याय होत आहे. तरी न.पा.ने टॅक्स मध्ये पेनॉल्टी घेऊ नये, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ता गणेश भोसले व या भागातील नागरीकां न.प.उपमुख्याधिकारी तरकासे यांच्याकडे केली आहे. यावेळी निवेदन देतांना अनिल पाटील, शुभम पाटील, सिध्दीविनायक सुर्यवंशी, किरण जैस्वाल, जयंती भोसले, उषा खांडवे, प्रेम खासबागे, संजय खांडवे, जय खोंडे, अजय घुले, संजय क-हाळे, रविंद्र पाखरे, कोमल डुकरे, विष्णू काळवाघे, सुरेंद्र लहासे यासह मुठे ले आऊट, तानाजी नगर, मच्छी ले आऊट या भागातील नागरीक उपस्थित होते. न.प.उपमुख्याधिकारी तरकासे, पाणी पुरवठा अधिकारी गायकवाड, साळोख यांचेशी गणेश भोसले यांनी याबाबत चर्चा केली. यावेळी पा.पु.अधिकारी गायकवाड यांनी तांत्रीक अडचणींमुळे आपल्या भागात पाणी पुरवठा होऊ शकला नाही. परंतु यापुढे नियमित ६ ते ७ आड पाणी होईल, असे ठोस आश्वासन देण्यात आले.

## मारहाणीमुळे उपचारादरम्यान ५५वर्षीय इसमाचा मृत्यू

जनसंचलन/ शेगाव

येथील वारकरी संप्रदाय नगरात राहणाऱ्या ५५ वर्षीय इसमाचा सईबाई मोटे उपजिल्हा सामान्य रुग्णालयात उपचारा दरम्यान मृत्यू झाल्याची घटना ८ मे रोजी दुपारी १२ वाजता घडली. याबाबत डॉ. साबळे तफे कक्ष सेवक गोविद मनोहर पिवाल समोसा रुग्णालय शेगांव यांनी दिलेल्या मेमोत रुग्ण नामे लक्ष्मण वसंतराव मानकर वय ५५ वर्ष रा संप्रदाय नगर शेगाव यांना मारहाण झाल्याने त्यास प्रथमोपचार करणे कामी स. मो. सा. रु शेगाव येथे भरती केले होते त्यांचा मृत्यु झाला आहे अशा मजकुराचा मेमो आणुन सादर केला आहे. अशा मेमो वरुन मर्ग दाखल करुन प्राथमिक तपास सपोनि तांगडे याचे कडे देण्यात आला आहे.




## जिल्हाधिकारी कार्यालयात महात्मा बसवेश्वर जयंती साजरी

जनसंचलन/बुलडाणा

जिल्हाधिकारी कार्यालयात आज महात्मा बसवेश्वर जयंती साजरी करण्यात आली. जयंतीनिमित्त उपजिल्हाधिकारी सुरेश थोरात यांनी प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी उपजिल्हाधिकारी सदाशिव शेलार, नाझर गजानन मोतेकर,



अपेक्षा जाधव, वर्षा मुळे आदी उपस्थित होते. उपस्थितांनी महात्मा बसवेश्वर यांना अभिवादन केले.